कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, अटी व शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम लागू करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण - १११११/प्र.क्र. ०३/१७/तांशि-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ एप्रिल, २०१७.

**<u>संदर्भ:</u>**- (१) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५
(२) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३ (भाग-१ )/तांशि-४, दि. २४/०४/२०१७ व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची अर्हता, अटी व शर्ती.
(३) शासन अधिसूचना क्र. संकीर्ण-११११/प्र.क्र.३/१७/तांशि-६, दि. २४/०४/२०१७ Maharashtra Unaided Private Professional Education Institution Regulation of Admission to the professional undergraduate Visual Art Course.

**<u>प्रस्तावना</u>** :-

वरील संदर्भ क्र.१ येथील महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ मधील कलम २ (द) अनुसार या विभागाच्या अखत्यारितील विविध व्यावसायिक पाठ्यक्रम संदर्भ क्र. २ अन्वये घोषित करुन त्या पाठ्यक्रमासाठीची किमान आवश्यक अर्हता, अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत.

यानुसार कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील विनाअनुदानित चित्रकला महाविद्यालयातील दृष्यकला ( BFA ) पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे उपरोक्त अधिनियमांतर्गत आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत एक खिडकीपध्दतीने राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यासाठी प्रवेश नियमावली वरील संदर्भ क्र. ३ अन्वये अधिसूचित केली आहे.

सदरच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ येथील अधिसूचित अटी व शर्तीनुसार व प्रवेश नियमामध्ये नमूद केलेल्या प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करुन कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय अनुदानित दृष्यकला पदवी ( BFA ), अभ्यासक्रमाचे प्रवेशदेखील विनाअनुदानित चित्रकला महाविद्यालयांमधील प्रवेशासमवेत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा यांचेमार्फत सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून एक खिडकी पद्धतीने करण्याबाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून वरील संदर्भ क्र. २ येथील अधिसूचनेत नमूद केलेल्या दृष्यकला पदवी अभ्यासक्रमाच्या ( BFA ) अर्हता, अटी व शर्ती हे या आदेशान्वये कला संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित, चित्रकला व अभिकल्प महाविद्यालयाच्या दृष्यकला पदवी अभ्यासक्रमांच्या ( BFA ) प्रवेशासाठी या आदेशान्वये लागू करण्यात येत आहेत.

२. तसेच वरील संदर्भ क्र.३ येथील दिनांक २४.०४.२०१७ च्या प्रवेश नियमातील प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करुन शासकीय / अनुदानित महाविद्यालयांतील दृष्यकला पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशदेखील अधिनियमातील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा यांच्यामार्फत विनाअनुदानित महाविद्यालयाच्या प्रवेशासमवेत एकत्रितपणे सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने करण्यात येतील.

३. सदरच्या शासकीय व अनुदानित महाविद्यालयांमधील दृष्यकला पदवी अभ्यासक्रमांच्या ( BFA ) प्रवेशासाठी जागांचे वाटप सोबतच्या जोडपत्रातील **परिशिष्ट -१** मध्ये नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत करण्यात येतील. तसेच या शासकीय / अनुदानित महाविद्यालयांमधील केंद्रीभूत प्रवेशाच्या अंतिम फेरीनंतर रिक्त झालेल्या / राहिलेल्या जागा भरण्यासाठीदेखील संगणकीय प्रणालीद्वारे एकत्रितपणे सामाईक प्रवेश करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकारी करतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०४२५१२२०३२३२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ.किरण पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई,
२) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित चित्रकला महाविद्यालये/ (संचालक,कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत)
७) निवडनस्ती-तांशि - ६.

परिशिष्ट – १

**(Annexure to the Government Resolution No. MIS-1111/CR-3/17, Dated 25th April, 2017)**

**Allocation of Seats for admissions to the Professional Diploma Courses, Under Graduate Visual Art Degree Course into the Government and Aided Professional Educational Institutions**

**Schedule-I**
**(For First Year of Under Graduate Degree Visual Art Course (BFA))**

| Sr. No | Type of Institution | CAP Seats as % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Maharashtra State Candidates | All India Seats | NRI | Minority Quota |
| 1 | Government/ Government Aided Institutions. | **90%** | 5% | 5% | Nil |
| These seats are available for Maharashtra State Candidature Candidates only. | | | | | |

**General Instructions**

(i) The disability criterion and other conditions of eligibility are as per the guidelines of MHRD.

(ii) The Supernumerary seats, as specified by the appropriate authority, shall be filled in by the Competent Authority.

(iii) The Jammu and Kashmir Quota seats shall be filled in by the Competent Authority. The number of seats shall be as per the policy of the Government.

(iv) For NRI candidature candidates, the seats to the extent of 5% can be filled in from NRI candidature candidates. The remaining 95% seats are then filled in from the Maharashtra Candidature Candidates.

(v) Transfer of Candidates in Under Graduate Degree Courses (Course or Institution) after one year as per following conditions,-

(a) The candidate once admitted in first year shall not be eligible for transfer to any other institution during the same academic year.

(b) The candidate passing the First year examinations in full or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer.

(c) There shall be No transfer of students at any stage in any case from Un-Aided Institution to Government or Government Aided Institutions. However, the candidate from Government or Government Aided institution may seek transfer to Un-Aided educational institution for which they shall apply to the Admission Regulation Authority.

(d) Transfer in Government or Government aided Institutions- Eligible Candidates aspiring for a transfer from Government or Government Aided Institution to other Government or Government Aided Institution, shall apply in writing to the Principal in which he/she studied first year. The Principal or Director shall forward the consolidated branch wise merit list of eligible candidates giving details like Name, Course, percentage of Marks, Names of Courses and Institution in order of preference to which candidates desires to seek transfer, reasons for transfer and Remarks, along with course wise vacancy position in institution, to the Director of Art, Maharashtra State, so as to reach him as per the schedule given by him

(e) All the Principals of Government and Government Aided Institutions shall submit vacancy position of all courses to the Directorate of Art, Mumbai before stipulated date.

(f) No application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Directorate.

(g) If the result of the candidate is not declared before the process of transfer, candidates of that university / board / Institution will lose claim on transfer.

----------------x--------------